अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# डान्सबारला पुन्हा बंदी घालण्याचा स्वागतार्ह निर्णय

ज्या गोष्टींमुळे सामाजिक आरोग्य बिघडू शकते आणि विकृतीचा विळखा घट्ट होऊ शकतो अशा मुद्यांबाबत राजकीय इच्छाशक्तीच त्याच्याविरुध्द काम करू शकते. डान्सबार बंदीबाबत राज्य सरकारने हीच इच्छाशक्ती दाखवली आहे. यापूर्वी घातलेली बंदी सर्वोच्च न्यायालयामध्ये टिकू शकली नाही. कायद्यामधल्या तरतुदींचा गैरफायदा घेत डान्सबार मालकांनी त्याविरुध्द न्यायालयात याचिका दाखल केली. ही बंदी गैर असल्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिला आणि प्रामुख्याने मुंबईतल्या बारमालकांनी अक्षरशः फटाके फोडून दिवाळी साजरी केली. मात्र आता सरकारने याच डान्सबार बंदी कायद्यात असलेल्या त्रुटी काढून पुन्हा तो कायदा लागू केला आहे. पंचतारांकित हॉटेलपासून ते गावागावातल्या अनाठायी धांगडधिंगा घालणाऱ्या डान्सबारना लगाम घालता येऊ शकेल.केवळ दोन-चार त्रुटींचा मुद्दा हातात घेऊन डान्सबार मालकांनी न्यायालात धाव घेतली. सरकारचा हा बंदी घालण्यामागचा हेतू फार वेगळा होता. परंतु बार मालकांना असे वाटत होते की, त्यांच्या कमाईवर गदा आणण्याचे काम सरकारच्या बंदीने केले. इथे केवळ बारमालकांना त्रास द्यायचा किंवा त्यांच्या धंद्यावर परिणाम करायचा म्हणून बंदी आणलेली नव्हती. तर विशेषतः महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांमध्ये डान्सबारमुळे अक्षरशः कुटुंबच्या कुटुंब उद्ध्वस्त होण्याची वेळ आली होती. तरुण पिढीचे प्रचंड नुकसान करणारा हा व्यसनाचा विळखा योग्यवेळी जर रोखला नाही तर एका फार मोठ्या सामाजिक संकटाला आमंत्रण देण्यासारखे ठरणार होते. याबाबत सध्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्याकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. घरादाराची किंवा घरातल्या तरुण मुलाची राखरांगोळी करणारे हे व्यसन कायदा करूनच रोखणे शक्य होते. म्हणूनच सामाजिक आरोग्याची गरज ओळखून ही बंदी आणली गेली. यामध्ये सरकारी तिजोरीचे प्रचंड नुकसान होत असूनही सरकारने हा निर्णय घेतला. याबद्दल गृहमंत्री आर. आर. पाटील यांचे अभिनंदनच केले पाहिजे. कारण त्यांच्या या निर्णयाने त्यांच्याच मंत्रीमंडळातल्या काही मंत्र्यांनी विरोध केला. नारायण राणे यांनीसुध्दा या बंदीची गरज नाही, असे सांगून आपल्या बौध्दिक दिवाळखोरीचे प्रदर्शनच केले होते. राज्याचे हित कशात आहे, जनतेला कशापासून दिलासा मिळणार आहे, याचा विचार न करता केवळ राजकीय हडेलहप्पी करण्याचा प्रकार निदान या बंदीमुळे तरी उधळला गेला असे म्हणता येईल.

## तरुण पिढीचे नुकसान

प्रत्येकवेळेला जर राजकीय पक्षांनी किंवा सत्ताधाऱ्यांनी सहकारी महसुलाच्या उत्पन्नाचाच विचार केला तर मोठी विचित्र परिस्थिती निर्माण होऊ शकते. आज केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर देशाच्या अनेक भागांमध्ये दारूच्या दुकानांनी अक्षरशः हैदोस घातलेला आहे. भारताताले एकही असे पर्यटन स्थळ शिल्लक राहिलेले नाहीत की, तिथले मद्यविक्री तेजीमध्ये नाही. अगदी तीर्थक्षेत्रांच्या इथेसुध्दा दारू दुकानांना चलती आहे. सरकारच केवळ सरकारी उत्पन्नाचे कारण पुढे करून जनतेचे कसे नुकसान करते त्याचे हे ढळढळीत उदाहरण म्हणता येईल. काहीप्रमाणात हे वास्तव जरी लक्षात घेतले तरी त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील काही विकृत प्रवृत्ती वाढीला लागणार असतील तर त्या रोखण्याचे कामही सरकारलाच करणे भाग होते. महाराष्ट्रातल्या डान्सबार बंदीमागे असाच एक सामाजिक आशय असलेला हेतू आहे, असे आम्ही मानतो. कारण शहरात या डान्सबार बंदीने जे काही नुकसान करायचे होते ते केलेच आहे. धनदांडग्यांची पोरंबाळं आपल्या बापजाद्यांच्या पैशावर डान्सबारमध्ये जाऊन आपले शौक पूर्ण करू शकतात. त्याचेच प्रदर्शन अलीकडे चित्रपटातून आणि टीव्ही सिरियल्समधून होत असते. ग्रामीण भागातल्या सामान्य परिस्थितीतल्या तरुणांना या परिस्थितीची तेवढीशी कल्पना नसते. केवळ या व्यसनांचे अनुकरण करण्याचे काम ते करतात. राज्याच्या ग्रामीण भागात जिथे धड पन्नास हजाराची लोकवस्ती नाही, त्याठिकाणीसुध्दा पाच-पाच, दहा-दहा डान्सबारचे धिंगाणे सुरू झाले. गावातला अर्धशिक्षित तरुण आपल्या आई-बापाशी खोटे बोलून वेळ पडली तर कर्जाने पैसे घेऊन आपला शौक पूर्ण करू लागला. स्वतः आर. आर. पाटील हे ग्रामीण भागातून पुढे आलेले नेतृत्व आहे. त्यांच्याकडे पश्चिम महाराष्ट्रातल्या अनेक गावांमध्ये डान्सबार तरुणांचे कसे खच्चीकरण करत आहे आणि अगदी साधी भोळी असणाऱ्या संस्कारक्षम कुटुंबांची देखील या एका विकृतीमुळे कशी धुळधाण होत आहे. याच्या कहाण्या त्यांनी ऐकल्या. व्यसनांचा हा दुर्दैवी रोग मुळासकट जरी उखडता येत नसला तरी त्याची विषारी फळे नष्ट केली पाहिजेत, अशा उद्देशाने त्यांनी बंदी घालण्याचा निर्णय घेतला.

## बारमालकांची लॉबी

सरकारने कायद्यात दुरुस्ती करून पुन्हा बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय हा निश्चितच स्वागतार्ह ठरतो. अन्यथा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर एखादे सरकार थंड बसले असते आणि बार मालकांना आणखीनच हैदोस घालायला संधी मिळू शकली असती. परंतु आर. आर. पाटील यांनी आपला निर्धार कायम ठेवला. त्या कायद्यातल्या त्रुटी बाजूला केल्या आणि ही बंदी पुन्हा लागू करून आपली राजकीय इच्छाशक्ती दाखवून दिली. गुटखा बंदीबाबतसुध्दा त्यांचा हाच हेतू आहे. आज या साध्या व्यसनामुळेसुध्दा अनेक तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. कर्करोगासारख्या भीषण रोगाला आमंत्रण देणारे हे व्यसन काही प्रमाणात का होईना, परंतु रोखण्याचे काम यानिमित्ताने केले गेले. आजच्या सामाजिक जीवनाचा विचार केला तर तरुण पिढी वेगाने विकृतीच्या तडाख्यात सापडते आहे. चित्रपट टीव्ही किंवा इंटरनेटवरच्या फेसबुकच्या माध्यमातून वाटेल त्या प्रकारच्या वाईट गोष्टी बिनदिक्कतपणे करण्याची आजच्या पिढीची तयारी असते. जे काम आजच्या शिक्षण पध्दतीने करायला हवे, ते काम कायद्याने करायची वेळ आली आहे. ज्या कुटुंबामधून संस्कारांचे जतन व्हायला पाहिजे तिथे वाईट व्यसनांचे आक्रमण होत आहे आणि त्याला सरकारी कायदे कारणीभूत ठरू नयेत, असे आम्हालादेखील वाटते. या अतिशय संवेदनशील मुद्यांबाबत राज्य सरकारने दाखवलेली कठोरता नक्कीच वाखाणण्यासारखी आहे. आज महाराष्ट्रातली बिअरबार लॉबी इतकी तगडी आहे की, पैशाच्या जोरावर त्यांना पाहिजे तसे निर्णय करून घेऊ शकते. निदान डान्सबार बंदीबाबत सरकार आपल्या भूमिकेवर ठाम राहिले ही गोष्ट निश्चितच महत्वपूर्ण मानली पाहिजे.